नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 11/07/2020 (शनिवार)
(सायंकाळ)

---

## अवैधरित्या रेती तस्करी करणाऱ्या आरोपीविरूध्द स्थानिक गुन्हे शाखेची धडक कार्यवाही करून करोडोचा मुद्देमाल जप्त

दिनांक 11/07/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक पोस्टे अरोली हद्दीत रात्र गस्त करीत असतांना त्यांना मुखबिराद्वारे खात्रीशिर माहिती मिळाली की, ''भंडारा येथून खात मार्गे काही लोक 10 चक्का वाहनाव्दारे अवैधरित्या वाळूची तस्करी करीत आहे.'' अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने दिनांक 11/07/2020 चे 03.20 वा. दरम्यान अरोली ते भंडारा रोड वरील खात चौकात नाकाबंदी करून एकुण पाच 10 चक्का टिप्पर वाहन क्र. एमएच– 49/ऐटी– 1318, एमएच– 40/बीएल– 0160 क्रमांकाचा टिप्पर, एमएच– 40/बीजी– 9185 क्रमांकाचा टिप्पर, एमएच– 40/बीजी– 6461 क्रमांकाचा टिप्पर, एमएच– 40/बीएल– 9985 क्रमांकाचा टिप्पर संशयीतरित्या मिळून आले. सदर वाहनाची तपासणी केली असता प्रत्येक वाहनामध्ये 6 ब्रास रेती भरून असल्याचे मिळून आले. सदर रेती संबधात वाहना चालकांकडे कोणताही परवाना/रॉयल्टी मिळून आली नाही. सदर पाचही वाहन चालकांनी त्यांचे मालकांचे सांगण्यावरून भंडारा येथील तामसवाडी घाटावरील वैनगंगा नदीच्या पात्रातील शासनाचे मालकीचे सुमारे 30 ब्रास रेती अवैधरित्या उत्खनन करून खात मार्गे नागपूरला घेवून जात असल्याचे उघडकीस आले. वाहन चालकाने ताब्यातुन एकुण 30 ब्रास रेती कि. 90,000/–रू. आणि वरील पाचही 10 चक्का वाहनाची प्रत्येकी कि. 30,00,000/–रू. प्रमाणे 1,50,00,00/–रू. असा एकुण कि. 1,50,90,000/–रू. किमतींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी वाहन क्र. एमएच–49/एटी–1318 चा चालक रोशन राध्येश्याम इवनाते, वय 36 वर्ष, रा. बुटीबोरी वाहन मालक सुनिल राकस, वय अंदाजे 40 वर्ष, रा. बिडीपेठ, नागपूर वाहन क्र. एमएच– 40/बीएल– 0160 चा चालक स्वप्निल रामदास मंडारे वय 28 वर्ष, किनी त. हिंगणा नमुद दोन्ही वाहनाचे मालक धिरज गावंडे, वय अंदाजे. 45 वर्ष, रा. कळमेश्वर वाहन क्र. एमएच–40/बीजी–9185 चा चालक प्रदीप चरण मेश्राम, वय 44 वर्ष, रा. गोरेवाडा नागपूर वाहन क्र. एमएच–40/बीएल–9985 चा चालक सुरेन्द्र धनेश्वर मुंडा, वय 55 वर्श, रा. खरबी आणि नमुद दोन्ही वाहनाचा मालक कन्हैया भुरे वय अंदाजे 42 वर्ष रा. मानेवाडा चौक नागपूर यांच्या विरूद्ध पो. स्टे. अरोली येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे नेतृत्वात पोउपनि सचिन मत्ते, पोलीस हवालदार राजेन्द्र सनोडिया, नाना राऊत, पोलीस नायक दिनेश आधापुरे, पोलीस शिपाई अमोल वाघ, विपीन गायधने व चालक पोना अमोल कुथे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर